मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मुळशीचे पाणी दिले तरच करा हद्दवाढ : आयुक्त शेखर सिंह यांची राज्य सरकारला विनंती

## सात गावांच्या समावेशाच्या प्रस्तावाबाबत हालचाली सुरु : येत्या काही दिवसात महानगरपालिकेची हद्दवाढ होण्याची दाट शक्यता आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या हद्दीलगत असलेली सात गावांचा पिंपरी-चिंचवडमध्ये समावेश करण्याचा प्रस्ताव मागील नऊ वर्षांपासून राज्य सरकारकडे मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. परंतु त्या गावांच्या समावेश प्रस्तावावर महायुती सरकारकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. येत्या काही दिवसात महानगरपालिकेची हद्दवाढ होण्याची दाट शक्यता आहे. दरम्यान, महानगरपालिकेची हद्दवाढ करायची असेल तर पहिल्यांदा मुळशी धरणाचे पाणी शहराला द्यावे, अशी विनंती राज्य सरकारला महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी केली आहे.

राज्य सरकारने चाकण, आळंदी, राजगुरू नगरपरिषद आणि परिसरातील लगतची गावे मिळून नवीन महापालिका तयार करण्यात येत आहे. त्याकरिता पिंपरी-चिंचवड महापालिकेने सकारात्मक अहवालदेखील सादर केला आहे. त्यानंतर पुणे महापालिकेतदेखील नव्याने २३ गावांचा समावेश करण्यात आला आहे. तरीही पिंपरी-चिंचवड महापालिकेत सात गावांचा समावेश करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे लालफितीत अडकला आहे.



### हिंजवडी आयटी सीटीमुळे येणार पायाभूत सुविधांवर ताण

» पिंपरी-चिंचवडमध्ये सात गावांचा समावेश केल्यास महानगरपालिकेच्या यंत्रणेवर ताण येणार आहे. तेथील गावांना पाणी, कचरा, ड्रेनेज, रस्ते, पथदिवे आदी सोयी-सुविधा द्याव्या लागणार आहेत. शहराची भविष्यातील वाढती लोकसंख्या, सात गावांचा समावेश लक्षात घेता मुळशी धरणात ७६० एमएलडी पाणी आरक्षित करून राज्य सरकारने द्यावे, अशी मागणी आयुक्त शेखर सिंह यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीलगत गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजवडी, माण, नेरे, सांगवडे ही सात गावे आणि पुणे महापालिकेतील दिघी, कळस गावचा काही भाग, विठ्ठलनगर (देहू) असे एकूण ७ गावे आणि तीन वाढीव भागांचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समाविष्ट करण्याचा प्रस्ताव राज्याच्या नगरविकास विभागाकडे पाठविण्यात आला आहे. या गावांचा समावेश करण्याचा प्रस्ताव पाठवून तब्बल नऊ वर्षे लोटली आहेत, तरीही राज्य सरकारने मंजुरी दिलेली नाही.

### पालिकेत 56.72 चौरस किमीचे क्षेत्रफळ वाढेल?

» पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत सात गावांचा आणि काही भागाचा समावेश करण्यात आल्यास तब्बल ५६.७२ चौरस किमीचे क्षेत्रफळ वाढणार आहे. यामध्ये गहुंजे- ५.०५ चौरस किमी, जांबे-६.३७ चौरस किमी, मारुंजी-६.५५ चौरस किमी, हिंजवडी- ८.३३ चौरस किमी, माण- १९.०५ चौरस किमी, नेरे- ५.२३ चौरस किमी, सांगवडे- ३.४४ चौरस किमी, दिघीचे वाढीव क्षेत्र-२.२५ चौरस किमी, कळसचे वाढीव क्षेत्र- ०.३६ चौरस किमी असे एकूण - ५६.७२ चौरस किमी वाढणार आहे. सध्यस्थितीत पिंपरी-चिंचवड शहराचे क्षेत्रफळ -१८१ चौरस किलोमीटर आहे. या गावांचा समावेश झाल्यानंतर २३७.७२ चौरस किमी क्षेत्रफळ होणार आहे.

राज्य शासनाच्या नगर विकास विभागाकडे ३ जून २०१५ ला प्रस्ताव पाठविण्यात आला. पालिकेच्या प्रस्तावावर शासनाने अनेकदा माहिती मागविली आहे. पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाकडून त्याबाबत नोव्हेंबर २०20 ला अभिप्राय मागविला होता. त्यानंतर दरवर्षी स्मरण पत्र, त्या प्रस्तावाची फाईल नगर विकास विभागाकडे पाठविण्यात येते. तरीही नगर विकास विभागाकडून कोणतीही कार्यवाही होताना दिसत नाही.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागाचा कारभार ढेपाळला

## आर्थिक वर्ष संपत आले तरी मालमत्ताकराची बिले मिळेनात, महापालिकेने छापलेली सहा लाख बिले गेली कुठे?

**पिंपरी | प्रतिनिधी**

आर्थिक वर्ष संपण्यास अवघे तीन महिने बाकी असतानाही अद्यापपर्यंत शहरातील अनेक भागांतील नागरिकांना मालमत्ताकराची बिलेच मिळालेली नाहीत. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागाचा कारभार आता ढेपाळला आहे. त्यामुळे अनेक नागरिकांना किती मालमत्ताकर भरायचा आहे, याची माहितीच नाही.



दरम्यान, कर संकलन विभागाने मालमत्ताकराची बिले घरोघर पोहचिवण्याचे महिला बचत गटांना दिले आहे. मात्र, या वर्षी या गटांकडून बिले वाटप करण्यात दिरंगाई होत असल्याचे समोर आले आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून महापालिकेच्या करसंकलन विभागाकडून घरोघरी, दुकाने व आस्थापनांवर जाऊन मालमत्ताकरांची बिले वाटण्यात येतात. त्यासाठी एका बिलामागे महापालिका बचत गटांना २० रुपये मिळतात.

या कामाचे बचतगटाच्या महिलांना प्रशिक्षणदेखील देण्यात आले आहे. एप्रिल व मे २०२४ या दोन महिन्यांत १०० टक्के बिल वाटप झाल्याचा दावा करसंकलन विभागाने केला आहे. मात्र, सन २०२४ - २५ या आर्थिक वर्षांतील नऊ महिने संपत आले तरी, अद्याप मालमत्ताधारकांना बिले मिळालेली नाहीत. त्यामुळे नेमके किती बिल आहे, हे संबंधित नागरिकांना समजले नाही. हे कमी म्हणून की काय करसंकलन विभागाकडून दररोज एसएमएसचा मारा केला जात आहे. या माध्यमातून नागरिकांकडून बिलांची मागणी केली जात आहे. मालमत्ताधारकांच्या मोबाईलवर बिल भरा, विलंब दंड टाळा, बिल न भरल्यास जप्तीपूर्व नोटीस दिली जाईल. मालमत्ता जप्त केली जाईल, असे संदेश मोबाईलवर येत आहेत. मात्र, बिल नसल्याने ते नागरिकांना भरता येत नाहीत. या संदर्भात तक्रारी करूनही त्यांना बिले दिले जात नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

# विचारभिन्नता नव्हे तर विचारशून्यता ही समस्या : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

**बालगंधर्व रंगमंदिर येथे मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित अभीष्टचिंतन सोहळ्यात गडकरी बोलत होते.**

**पुणे | प्रतिनिधी**

विचारभिन्नता नव्हे तर विचारशून्यता ही आपल्या देशासमोरील समस्या आहे. आपली बांधीलकी कशासोबत आहे, हे लोकांना माहीत असले पाहिजे. पक्षात आणि संघटनेमध्ये कार्यकर्त्यांचा माणूस म्हणून विचार करायला हवा जो केला जात नाही.

विचारभिन्नता नव्हे तर विचारशून्यता ही आपल्या देशासमोरील समस्या आहे. आपली बांधीलकी कशासोबत आहे, हे लोकांना माहीत असले पाहिजे. पक्षात आणि संघटनेमध्ये कार्यकर्त्यांचा माणूस म्हणून विचार करायला हवा जो केला जात नाही. अलीकडे सत्ता येईल तिकडे नेते पळतात, सत्ता गेली की तिथून दुसरीकडे उड्या मारतात, जीवनात पैसा हा महत्त्वाचा असला तरी सर्वस्व नाही. त्याचप्रमाणे आरोग्यालाही महत्त्व द्यायला हवे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी पुण्यात केले.



मराठा सेवा संघ व पुरुषोत्तम खेडेकर अमृतमहोत्सव गौरव समिती यांच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिर येथे मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित अभीष्टचिंतन सोहळ्यात गडकरी बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय घोगरे (अध्यक्ष मराठा सेवा संघ, महाराष्ट्र, अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर अमृतमहोत्सव समिती) होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील, पुरुषोत्तम खेडेकर, आमदार रेखा खेडेकर, माधवराव पाटील शेळगावकर, ख्यातनाम कवी इंद्रजित भालेराव, कर्नाटकमधील आमदार डॉ. मारोतराव मुळे, माजी आयपीएस अधिकारी विक्रम बोके, व्यंकटराव गायकवाड (निवृत्त सचिव जलसंपदा विभाग), हेमंतकुमार देशमुख (मुख्य अभियंता), विठ्ठलराव गायकवाड, गिरीश जोशी (मुख्य अभियंता, अमरावती), आमदार शंकर जगताप, राजेंद्र पवार, रवींद्र माळवदकर, माजी आमदार विलास लांडे, राजेंद्र डुबल आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मदन पाटील लिखित 'क्रांतिपुरुष पुरुषोत्तम खेडेकर' या गौरव ग्रंथाचे प्रकाशन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले.

दरम्यान सत्काराला उत्तर देताना पुरुषोत्तम खेडेकर यांनी मराठा सेवा संघाच्या कार्याचा आढावा घेतला, एक शासकीय अधिकारी म्हणून काम करताना आलेल्या अडचणी आणि त्यावर मात करून सामाजिक संघटन कसे वाढविले व नोकरीत असताना तरुणांना रोजगाराच्या संधी कशी उपलब्ध करून दिल्या याची माहिती दिली.

### सामाजिक विषमता संपुष्टात आली पाहिजे

» समाजातील अस्पृश्यता, जातीयता, विषमता संपुष्टात आली पाहिजे. कारण तुमची गुणवत्ताच तुम्हाला श्रेष्ठ बनवते. ज्यामुळे जातपात, भाषा, राज्य आणि पंथाच्या पलीकडे जाऊन तुम्हाला ओळख मिळते. ही गुणवत्ता ज्ञानातून मिळते. आज जर भारताला विश्वगुरू बनायचे असेल तर ज्ञान महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी सांगितले. मी माझ्या आई-वडिलांनंतर छत्रपती शिवाजी महाराजांना मानतो. कारण प्रत्येक पायंड्यावर त्यांच्यासारखा आदर्श राजा दुसरा कोणी नाही. ते खऱ्या अर्थाने सेक्युलर होते. कारण सर्वधर्म समभाव असणारे ते एकमेव राजे होते. त्यांनी स्वराज्याचा विस्तार करताना दुसऱ्या धर्माची प्रार्थनास्थळे पाडली नाहीत, कोणत्याही महिलांवर अन्याय, अत्याचार केले नाहीत, असेही गडकरी यांनी नमूद केले.

# वाहतूक कोंडीवर 'मिशन फिफ्टीन'ची मात्रा; पालिका व पोलीस प्रशासन एकत्र

**जगभरातील वाहतूक कोंडी असणाऱ्या शहरांच्या यादीत पुण्याचा सातवा क्रमांक लागतो, तर देशात वाहतूककोंडीत पुण्याचा दुसरा क्रमांक लागतो.**

**पुणे | प्रतिनिधी**

जगभरातील वाहतूक कोंडी असणाऱ्या शहरांच्या यादीत पुण्याचा सातवा क्रमांक लागतो, तर देशात वाहतूककोंडीत पुण्याचा दुसरा क्रमांक लागतो. देशात एक नंबरवर बंगळुरूचा नंबर लागतो त्याखालोखाल पुण्याचा नंबर लागतो. त्यामुळेच शहरातील वाहतूककोंडी सोडवण्यासाठी पुणे पोलीस व पुणे महापालिकेने एकत्र येऊन अंतर्गत रस्त्यांवरील अडसर दूर करण्यावर भर दिला असून त्यामुळे या रस्त्यांवरील वाहनचालकांवरील कोंडीत अडकून पडण्याचे प्रसंग कमी येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.



पुणे पोलीस आयुक्त कार्यालयात अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील व पालिकेच्या पथविभागाचे मुख्य अभियंते अनिरुद्ध पावसकर यांच्याकडून संयुक्त पत्रकार परिषद घेण्यात आली. 'मिशन फिफ्टीन'च्या माध्यमातून पुणे शहरातील प्रमुख १५ रस्त्यांवरील वाहतूककोंडी सोडवण्यासाठी त्या रोडवर सुधारणा करण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यासाठी काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. रामटेकडी चौक, काळूबाई चौक, सोपानबाग चौक, फातीमानगर चौक, भैरोबानाला चौक, मम्मादेवी चौक, गोळीबार मैदान चौक, रामटेकडी ओव्हरब्रीज, वैदवाडी चौक, हडपसर वेस चौक, गाडीतळ चौक, रविदर्शन चौक, पंधरा नंबर चौक आणि लक्ष्मी कॉलनी चौक या रस्त्यावरील वाहतूककोंडी सोडवण्यासाठी नव्याने सुधारणा करण्यात आली आहे.

पावसाचे पाणी साचल्याने काही भागात वाहतूककोंडी होत होती त्या रस्त्यांवरील चेंबरची संख्या वाढवली गेली आहे. यासोबतच काही मुख्य रस्त्यांवरील सिग्नलची वेळ वाढवण्यात आली आहे. रस्त्याच्या कडेला थांबणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्सना आतल्या बाजूला थांबा देण्यात आला आहे. अनेक चौकातील फुटपाथची रुंदी कमी करून रस्त्याची रुंदी वाढवण्यात आली आहे.

### 2007 मध्ये 19 लाख झाडे?

» अनेक रस्त्यांच्या मध्ये दुभाजकांमुळे अडथळा निर्माण होत होता. ते असे दुभाजक काढून रस्ता रुंद करण्यात आला आहे. रस्त्यामध्ये येणारे बसथांबे रस्त्याच्या कडेला हलवण्यात आले आहेत. सिग्नलचे पोल, इलेक्ट्रिकल पोल शिफ्ट करण्यात आले आहेत. शहरातील जे रस्ते अरुंद होते त्यांचे रुंदीकरण करण्यात आले आहे. अनेक रस्त्यांवर नावाचे बोर्ड हे मधोमध दुभाजकांजवळ लावलेले होते तेही हटवण्यात आले आहेत. अनेक रस्त्यांच्या चौकात खड्डे होते ते बुजवून तिथे रोड सर्फेसिंग केले आहे. वाहतूक कोंडी होत असणाऱ्या रस्त्यांवर नव्याने यू टर्न देण्यात आले आहेत. काही प्रमुख रस्त्यांवरील स्ट्रेट कंटिन्यू सिग्नल सुरू ठेवण्यात आले आहेत. राईट व लेफ्ट टर्न प्रायोगिक तत्त्वावर बंद करण्यात आले आहेत. दुभाजकांवरील इलेक्ट्रिक पोल इतरत्र हलवण्यात आले आहेत. रस्त्यांना अडथळा निर्माण होणारे पादचारी मार्ग काढून तिथे रस्ता रुंद करण्यात आला आहे. रस्त्यांवर नागरिकांकडून केले जाणारे अतिक्रमणदेखील हटवण्यात आले आहे.

# सात वर्षांनंतरही वृक्षगणनेचे काम अर्धवट

## सॅटेलाईट इमेजद्वारे वृक्षगणना, 2007 नंतर 2018 मध्ये केली वृक्षगणना, स्वतंत्र ॲपची निर्मिती अद्याप नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

पर्यावरणाच्या दृष्टीने शहरी क्षेत्राच्या एकूण तीस टक्के क्षेत्रावर झाडे असतील, तरच प्रदूषण कमी होऊ शकते, त्यानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या उद्यान विभागाकडून दरवर्षी लाखो झाडांच्या रोपांची खरेदी करून लागवड करण्यात येते. मात्र, शहरात एकूण किती वृक्ष आहेत. याची वस्तुनिष्ठ आकडेवारी उद्यान विभागाकडे उपलब्ध होत नव्हती. त्यामुळे उद्यान विभागाकडून सॅटेलाईट इमेजद्वारे वृक्षगणना करण्याचे काम ठेकेदार कंपनीला दिले होते.

परंतु, सात वर्ष लोटली, तरीही कंपनीचे काम अर्धवट आहे. अद्याप स्वतंत्र ॲपची निर्मिती करण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधित कंपनीला ब्लॅक लिस्ट करून वृक्षगणनेचा अहवाल खुला करावा, अशी मागणी पर्यावरणप्रेमी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, सॅटेलाईट इमेजद्वारे जीआयएस पद्धतीने केलेल्या गणनेत शहरात ३२ लाख १६ हजार ७९९ वृक्ष असल्याचा दावा अधिकाऱ्यांकडून केला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात २००७ नंतर २०१८ पर्यंत तब्बल ११ वर्ष वृक्षगणना करण्यात आली नव्हती. तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांना महापालिका हद्दीत बेकायदेशीर वृक्षतोड वाढल्याचे लक्षात आले. लागवड केलेल्या वृक्षांचेदेखील संगोपन योग्य स्थितीत होत नव्हते. त्यामुळे हर्डीकर यांनी ११ जानेवारी २०१८ मध्ये सॅटेलाईट इमेजद्वारे वृक्षगणना करण्याचे आदेश दिले होते.

महापालिकेच्या उद्यान विभागाकडून वृक्षगणना करण्यासाठी मे. टेराकॅन इकोटेक प्रा. लि. कंपनीला काम दिले होते. तब्बल सात वर्षांनंतरही कंपनीकडून अद्याप काम पूर्ण केले नाही. त्यामुळे उद्यान विभागाने या कंपनीला दंडात्मक कारवाई करत कारणे दाखवा नोटीस बजाविली आहे.

महापालिकेने सॅटेलाईट इमेजद्वारे वृक्षगणना करण्यास प्राधान्य दिले. मे. टेराकॅन इकोटेक प्रा. कंपनीला दोन वर्षांसाठी कामाची मुदत देण्यात आली. हे काम ६ कोटी ७६ लाख ४५ हजार २३८ रुपयांचे होते. संबंधित कंपनीला वृक्षगणना झाल्यानंतर ३ वर्षे देखभालीची मुदत देण्यात आली होती. तसेच महापालिकेने सॉफ्टवेअर, यंत्रसामग्री खरेदीसाठी कंपनीला दोन कोटी रुपये सुरुवातीलाच अदा केले होते.

दरम्यानच्या काळात वृक्षगणना कामाला दिरंगाई झाली. ठेकेदाराची कामाची मुदतदेखील संपली. काम करताना कामास उशीर झाल्याने त्या ठेकेदार कंपनीला प्रतिदिन एक हजार रुपये दंड लावला होता. त्यावेळी कंपनीला दोन लाख ३८ हजाराचा दंडदेखील आकारला होता.



### क्षेत्रीय अधिकारी भाऊ-दादांचे बनले कार्यकर्ते

» महापालिका हद्दीतील क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत चौका-चौकात, सिग्नल, गल्लो-गल्लीत लागलेल्या एकाही फ्लेक्सवर महापालिकेची परवानगी दिसत नाही. महापालिकेच्या क्षेत्रीय अधिका-यांकडून परवानगी घेऊन फ्लेक्स लावणे बंधनकारक आहे. पण, क्षेत्रीय अधिकारी भाऊ-दादाचे कार्यकर्ते असल्यासारखे वागू लागल्याचे दिसत आहे. त्यामुळे अशा बेकायदा जाहिरातबाजीवर महापालिकेकडून कारवाई करणार कोण, असा सवाल उपस्थित होत आहे..

### 2007 मध्ये 19 लाख झाडे?

» महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन अधिनियम १९७५ नुसार रस्त्याच्या कडेने किती वृक्ष असावेत याबाबत मानक ठरला आहे. २४ मीटर व अधिक रुंदीचे रस्ते असल्यास प्रत्येक दहा मीटर अंतरावर एक वृक्ष असणे आवश्यक आहे. बारा ते २४ मीटर रुंदीचे रस्ते असतील, तर रस्त्याच्या दुतर्फा दहा मीटर अंतरावर एक वृक्ष, सहा मीटर ते बारा मीटर रुंदीच्या रस्त्यावर प्रत्येक २० मीटर अंतरावर एक वृक्ष असला पाहिजे. हे निकष पिंपरी-चिंचवड महापालिका पूर्ण करणार असल्याचे सांगण्यात आले. २००७ मध्ये केलेल्या वृक्षगणनेत शहरात १८ लाख ९३ हजार झाडे आढळली होती. त्यावेळी वृक्षगणना करण्यासाठी ९३ लाख रुपये खर्च आला होता.

“ झाडांचे संरक्षण व जतन करण्यास राज्य सरकारच्या १९७५ मधील अधिनियमानुसार निश्चित मानकांचे महापालिकेने उल्लंघन केले आहे. एका व्यक्तीमागे ४ झाडे यानुसार शहराच्या ३० लाख लोकसंख्येच्या चौपट म्हणजे १ कोटीपेक्षा अधिक झाडे शहरात असणे आवश्यक आहे. तसेच लागवड केलेल्या झाडांपैकी किती झाडे जिवंत आहेत. याविषयी आकडेवारी उपलब्ध नाही. सॅटेलाईट इमेजद्वारे केलेली वृक्षगणना कामाची नाही. वृक्षांची अंदाजे आकडेवारी काढली आहे. शास्त्रोक्त पध्दत वापरली तर वृक्षगणना प्रामाणिकपणे मिळेल. आमच्या अंदाजे शहरात १५ लाखांच्या आसपास वृक्ष आहेत

- विजय पाटील, अध्यक्ष- प्राधिकरण नागरी सुरक्षा समिती

# इतरांना जे मिळेल ते आम्हालाही हवे : छगन भुजबळ

## आरक्षणावर व्यक्त केले विचार : दोन्ही सरकारकडून निधीची अपेक्षा

**पिंपरी | प्रतिनिधी**

आपल्याला जे हवे आहे ते माळी, वंजारी म्हणून मिळणार नाही ओबीसी म्हणूनच मिळेल. आदिवासी व दलित ज्याप्रमाणे संघटित आहेत त्याप्रमाणे ओबीसी संघटित नाहीत. ओबीसींची मोट बांधण्याचे काम आपल्याला करावे लागेल. इतरांना जे मिळेल ते आम्हालाही मिळायला हवे. येथे आम्हीही आहोत आम्ही स्वस्थ बसणार नाही पेटून उठू. आई सुद्धा रडल्याशिवाय दूध पाजत नाही हे लक्षात घेता सरकारला जागे करावे लागेल असे प्रतिपादन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी येथे केले. तसेच ओबीसींना केंद्र व राज्यातून निधी मिळावा अशी अपेक्षाही भुजबळ यांनी व्यक्त केली.

महात्मा जोतिबा फुले मंडळाच्या वतीने चिंचवड येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी ओबीसी विकास, दुग्धविकास, अपारंपरिक उर्जा मंत्री अतुल सावे , आमदार शंकर जगताप, रूपाली चाकणकर, राष्ट्रवादी काॅंग्रेसच्या महिला शहराध्यक्षा प्रा कविता आल्हाट, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर, माजी नगरसेविका माधवी राजापुरे, सुरेश भोईर उपस्थित होते.

यावेळी भुजबळ म्हणाले की, तुमचा आवाज नसेल तर उपयोग नाही. तुम्ही जिवंत आहात हे दाखविण्याची गरज आहे. सावित्रीबाई फुले यांनी शाळा सुरू केल्या तेव्हा लोक ते बंद पाडायला आले. लहुजी वस्ताद दांडके घेऊन उभे राहिले. तुमच्याकडे हेही हवे. असे भुजबळ म्हणाले. राज्यातील महायुती सरकार सावित्रीबाई फुले यांचे काम पुढे नेत आहे. लाडकी बहीण योजना, विद्यार्थिनींना शिक्षणासाठी मदत हा त्याचाच भाग आहे.



### महात्मा फुले यांनी अंधश्रद्धेविरोधात काम केले

» सावित्रीबाई फुले यांनी महिला शिक्षण सबलीकरण यासाठी पहिले पाऊल टाकले. त्यांना दगड मारणारे सनातनी होते आणि आमचेही होते. कारण अंधश्रद्धेचा पगडा होता. कर्मठ ब्राह्मण असे आपण म्हणतो मात्र सावित्रीबाईंच्या पहिल्या शाळेला जागा भिडे यांनीच दिली. परांजपे, भांडारकर हे महात्मा फुले यांच्या बांधकाम कंपनीत पार्टनर होते. महात्मा फुले यांना विरोध करणारे ब्राह्मण होते तसेच सुधारक ब्राह्मण सुद्धा होते. महात्मा फुले यांनी ब्राह्मणांविरुद्ध नव्हे तर ब्राह्मण्यवादाविरोधात आणि अंधश्रद्धेविरोधात काम केले. पुढे काही मंडळींनी ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद वाढवला मात्र महात्मा फुले यांनी सर्वांना पोटाशी धरावे असाच विचार मांडला. महात्मा फुले समजून घ्यायचे असतील तर त्यांचे शेतकऱ्यांचा आसूड व गुलामगिरी यासारखी पुस्तके वाचायला हवीत असे भुजबळ म्हणाले.

# पुण्यात संतोष देशमुखांचे कुटुंबीय व मनोज जारंगे यांचा जनआक्रोश मोर्चा

## संतोष देशमुखांचे कुटुंबीय व मनोज जारंगे यांनी लाल महालातील जिजाऊंच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन मोर्चाला सुरुवात केली.

**पुणे | प्रतिनिधी**

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ पुण्यात सकल मराठा समाजाकडून जनआक्रोश मोर्चाला सुरुवात झाली आहे. यात देशमुख कुटुंबिय देखील सामील झाले आहे. लाल महाल ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा असणार आहे.

संतोष देशमुखांचे कुटुंबीय व मनोज जारंगे यांनी लाल महालातील जिजाऊंच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन मोर्चाला सुरुवात केली. मोर्चाला सुरुवात होण्यापूर्वी जरांगेंनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी धनंजय मुंडे शहाणा हो..अशा शब्दात जरांगेंनी पुन्हा निशाणा साधला.

पुण्यात काढण्यात आलेल्या या मोर्चाला अनेक नेत्यांनी उपस्थिती लावली आहे. संभाजीराजे छत्रपती, आमदार सुरेश धस, खासदार बजरंग सोनवणे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, आमदार रोहित पवार यांच्यासह अनेक नेते, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित आहेत.



### तर आज माझा भाऊ जिवंत असता - देशमुख यांचा भाऊ

» गृहमंत्र्यांचं कुठे तरी अपयश आहे का? असं तुम्हाला वाटतं का या प्रश्नावर उत्तर देताना देशमुख यांच्या भावाने मुख्यमंत्र्यांची आम्ही लवकरच भेट घेणार आहोत. असं सांगितलं. तसेच, आम्हाला न्याय पाहिजे. आरोपीला फाशी झाली पाहिजे. आरोपी खुप सराईत आहेत. त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत. त्यांच्यावर ज्या त्यावेळी कारवाई केली असती तर आज माझा भाऊ जिवंत असतो.

लक्ष्मण हाके यांच्या इशाऱ्यानंतरही मनोज जरांगेंनी धनंजय मुंडेंवर तोफ डागली आहे. धनंजय मुंडे शहाणा हो, मुख्यमंत्र्यांनी त्यांना आवरावं नाहीतर आम्ही थांबणार नाही. आमचे लोकं तुला अडकवतील, ज्या मराठ्यांनी वाचवलं त्यावर तुम्ही पलटला आहात, प्रतिमोर्चे काढले तर आम्हीदेखील तसेच उत्तर देवू, असं जरांगे यावेळी म्हणाले.

तसेच, संतोष देशमुख यांची क्रूरपणे हत्या केली. राज्य यांना कुठं न्यायचं आहे. या विरोधात राज्यभर आम्ही मराठे मोर्चे काढू. हा खून आमच्या जिव्हारी लागला आहे. आता मी थेट मुख्यमंत्र्यांना बोलणार आहे, त्यांना जातीय तेढ निर्माण करायची आहे, सरकारमध्ये राहून यांना जातीय तेढ निर्माण करायचा आहे. मुख्यमंत्र्याच्या शब्दावरती मराठे शांत आहेत. हे लोकं आम्हाला खुप त्रास देत आहेत. एकही आरोपी सुटला तर मुख्यमंत्र्यांनी मराठ्यांना धोका दिला असा संदेश जाईल, त्यामुळे सर्वांना शिक्षा द्या. आरोपी पुण्यातच कसे सापडत आहेत, मुंडेंनी हे सगळं थांबवावं, असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं आहे.

जरांगेंनी आरोपींच्या अटकेबाबतही प्रश्नचिन्ही उपस्थित केलं आहे. संतोष देशमुख यांचे मारेकरी पुण्यात कसे सापडले? हे आरोपी बीडमधून थेट पुण्यात का आले? या प्रकरणाचा तपास योग्य प्रकारे होण्याची गरज आहे. दोषींना कठोर शिक्षा व्हाली, अशी मागणीदेखील जरांगे यांनी यावेळी केली.

आरोपीला अजून शिक्षा झाली नाही, यावर मत विचारलं असता वैभवी देशमुख म्हणाल्या, 'आज महिना होत आहे अजूनही न्याय मिळत नाही. प्रशासनाला माझी विनंती आहे की, जे आरोपी आहेत आणि जे काही कोणी त्यांना मदत करत आहेत त्यांना कठोर शिक्षा व्हावी.

तसेच धनंजय मुंडे यांच्यासंदर्भात विचारलं असता, वैभवी म्हणाल्या, ते मला काही माहिती नाही, चाचूला माहिती असेल. आम्हाला फक्त न्याय हवा आहे.

### निकटवर्तीयांना अभय मिळायला नको- पृथ्विराज चव्हाण

» सरकार टिकवण्याठी निकटवर्तीयांना अभय मिळायला नको, अशा शब्दात प्रतिक्रिया व्यक्त करत माजी मुख्यमंत्री पृथ्विराज चव्हाण यांनी अप्रत्यक्षपणे नाव न घेता धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधला आहे. देशमुख यांच्या हत्येच्या दोषींना शिक्षा झालीच पाहिजे. गुंतवणुकदारांना खंडणीखोरांचा त्रास झाला. तर ते राज्यात येणार नाहीत. असही चव्हाण यावेळी म्हणाले.

# ऊस तोडणी मजुरांची पालावर आरोग्य तपासणी

## दौंड तालुक्यातील पाटेठाण येथील श्रीनाथ म्हस्कोबा कारखान्याचा अभिनव उपक्रम

**पुणे | प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील पाटेठाण येथील श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखान्याने ऊस तोडणी मजुरांचे आरोग्य निरोगी राहण्याठी कार्यक्षेत्रातील मजुरांच्या पालावर जाऊन मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. याचा लाभ एकूण ४४ ऊस तोडणी वाहतूक बंधू-भगिनींनी घेतला आहे. कारखान्याकडून दरवर्षी अभिनव, विधायक उपक्रम राबविले जात आहेत.



श्रीनाथ म्हस्कोबा कारखान्याचा २०२४-२५ चा ऊस गळीत हंगाम सुरू झाला आहे. उस तोडणी वाहतूक मजूर कुटुंबासहित कारखाना परिसरात तसेच कारखाना कार्यक्षेत्रात आले आहेत. परिसरातील ऊस तोडणी मजुरांची आरोग्य तपासणी कारखान्यामार्फत श्रीनाथ म्हस्कोबा मंदिरात केली होती. परंतु मजूर वाहन टोळ्या तसेच ट्रॅक्टरने वाहतुक करणाऱ्या टोळ्या या कार्यक्षेत्रात विविध गावात स्थलांतरित झालेल्या असतात. त्यांच्या आरोग्याची तपासणी करण्यासाठी श्रीनाथ म्हस्कोबाने हवेली- अष्टापूर गटामध्ये पिंपरी-सांडस येथील प्रत्यक्ष मजूर अड्डयावरच आरोग्य तपासणी करण्याचे आयोजन केले होते.

यात वाडे-बोल्हाई प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत आरोग्य तपासणी केली. ऊस तोडणी मजुरांची सर्वसाधारण आरोग्य तपासणीमध्ये रक्तदाब, रक्तातील साखर आदी तपासणी केल्या. कारखाना व प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत मोफत औषधांचेही वाटप केले. शिबिरात प्रामुख्याने महिलांची आरोग्यविषयक तपासणी करून त्यांना आवश्यक ते उपचार व मार्गदर्शन केले. आरोग्य शिबिरानिमित्त अल्पोपहारची व्यवस्था करण्यात आली होती.

याप्रसंगी वाडे-बोल्हाई प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन सूर्यवंशी व डॉ. हरेश लोहार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. महेश वडदरे, डॉ. अनघा पाचलेजावकर, डॉ. प्रवीण गजरे, राणी दौंडकर, सुनीता भोरडे यांनी आरोग्य तपासणीसाठी मोलाचे सहकार्य केले. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी डी. एम. रासकर, केन मॅनेजर एस. बी. टिळेकर, शेतकी अधिकारी ए. बी. शेंडगे, शेतकी विभागातील सर्व स्टाफ, ऊस वाहतूक कंत्राटदार व ऊस तोडणी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. मजुरांच्या पालावर जाऊन मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. याचा लाभ एकूण ४४ ऊस तोडणी वाहतूक बंधू-भगिनींनी घेतला आहे. कारखान्याकडून दरवर्षी अभिनव, विधायक उपक्रम राबविले जात आहेत.

### मजुरांचे आरोग्य चांगले राहावे, हाच उद्देश

» कारखान्याचे अध्यक्ष पांडुरंग राऊत म्हणाले की, ऊस तोडणी बांधवांचे आरोग्य चांगले रहावे, याकरिता कारखान्याच्या वतीने त्यांची मोफत आरोग्य तपासणीचे आयोजन केलेले आहे. कारखान्यावर वास्तव्यास मजुरांची काळजी कारखाना घेतच असतो. परंतु कार्यक्षेत्रामध्ये विविध गावात विखुरलेल्या ऊस तोडणी मजुरांचीही तपासणी व्हावी त्यांचे आरोग्य चांगले राहावे. हा आजच्या तपासणीचा मुख्य उद्देश आहे. कारखान्याच्या वतीने प्रत्येक वर्षी विविध आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात.